Test Paper : **II**

Test Subject : **MARATHI**

Test Subject Code : **K-3518**

Roll No. | | | | | | | | |

(Figures as per admission card)

OMR Sheet No. : ________________

TEST BOOKLET SERIAL NO.

## Name & Signature of Invigilator/s

Signature : ______________________________

Name : ______________________________

Time : 2 Hours

Maximum Marks : 200

Number of Pages in this Booklet : **16**

Number of Questions in this Booklet : **100**

**ಅಭ್ಯರ್ಥಿಗಳಿಗೆ ಸೂಚನೆಗಳು**

1. ಈ ಪುಟದ ಮೇಲ್ತುದಿಯಲ್ಲಿ ಒದಗಿಸಿದ ಸ್ಥಳದಲ್ಲಿ ನಿಮ್ಮ ರೋಲ್ ನಂಬರನ್ನು ಬರೆಯಿರಿ.
2. ಈ ಪತ್ರಿಕೆಯು ಬಹು ಆಯ್ಕೆ ವಿಧದ ನೂರು (100) ಪ್ರಶ್ನೆಗಳನ್ನು ಒಳಗೊಂಡಿದೆ.
3. ಪರೀಕ್ಷೆಯ ಪ್ರಾರಂಭದಲ್ಲಿ, ಪ್ರಶ್ನೆ ಪುಸ್ತಿಕೆಯನ್ನು ನಿಮಗೆ ನೀಡಲಾಗುವುದು. ಮೊದಲ 5 ನಿಮಿಷಗಳಲ್ಲಿ ನೀವು ಪುಸ್ತಿಕೆಯನ್ನು ತೆರೆಯಲು ಮತ್ತು ಕೆಳಗಿನಂತೆ ಕಡ್ಡಾಯವಾಗಿ ಪರೀಕ್ಷಿಸಲು ಕೋರಲಾಗಿದೆ.
   (i) ಪಶ್ನೆಪುಸ್ತಿಕೆಗೆ ಪ್ರವೇಶಾವಕಾಶ ಪಡೆಯಲು, ಈ ಹೊದಿಕೆ ಪುಟದ ಅಂಚಿನ ಮೇಲಿರುವ ಪೇಪರ್ ಸೀಲನ್ನು ಹರಿಯಿರಿ. ಸ್ಟಿಕ್ಕರ್ ಸೀಲ್ ಇಲ್ಲದ ಅಥವಾ ತೆರೆದ ಪುಸ್ತಿಕೆಯನ್ನು ಸ್ವೀಕರಿಸಬೇಡಿ.
   (ii) **ಪುಸ್ತಿಕೆಯಲ್ಲಿನ ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ ಮತ್ತು ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆಯನ್ನು ಮುಖಪುಟದ ಮೇಲೆ ಮುದ್ರಿಸಿದ ಮಾಹಿತಿಯೊಂದಿಗೆ ತಾಳೆ ನೋಡಿರಿ. ಪುಟಗಳು/ಪ್ರಶ್ನೆಗಳು ಕಾಣೆಯಾದ ಅಥವಾ ದ್ವಿಪ್ರತಿ ಅಥವಾ ಅನುಕ್ರಮವಾಗಿಲ್ಲದ ಅಥವಾ ಇತರ ಯಾವುದೇ ವ್ಯತ್ಯಾಸದ ದೋಷಪೂರಿತ ಪುಸ್ತಿಕೆಯನ್ನು ಕೂಡಲೆ 5 ನಿಮಿಷದ ಅವಧಿ ಒಳಗೆ, ಸಂವೀಕ್ಷಕರಿಂದ ಸರಿ ಇರುವ ಪುಸ್ತಿಕೆಗೆ ಬದಲಾಯಿಸಿಕೊಳ್ಳಬೇಕು. ಆ ಬಳಿಕ ಪ್ರಶ್ನೆಪತ್ರಿಕೆಯನ್ನು ಬದಲಾಯಿಸಲಾಗುವುದಿಲ್ಲ, ಯಾವುದೇ ಹೆಚ್ಚು ಸಮಯವನ್ನೂ ಕೊಡಲಾಗುವುದಿಲ್ಲ.**
4. ಪ್ರತಿಯೊಂದು ಪ್ರಶ್ನೆಗೂ (A), (B), (C) ಮತ್ತು (D) ಎಂದು ಗುರುತಿಸಿದ ನಾಲ್ಕು ಪರ್ಯಾಯ ಉತ್ತರಗಳಿವೆ. ನೀವು ಪ್ರಶ್ನೆಯ ಎದುರು ಸರಿಯಾದ ಉತ್ತರದ ಮೇಲೆ, ಕೆಳಗೆ ಕಾಣಿಸಿದಂತೆ ಅಂಡಾಕೃತಿಯನ್ನು ಕಪ್ಪಾಗಿಸಬೇಕು.

   **ಉದಾಹರಣೆ :** (A) (B) ● (D)

   (C) ಸರಿಯಾದ ಉತ್ತರವಾಗಿದ್ದಾಗ.
5. ಈ ಪ್ರಶ್ನೆ ಪತ್ರಿಕೆಯ ಜೊತೆಯಲ್ಲಿ **ಕೊಟ್ಟಿರುವ OMR ಉತ್ತರ ಹಾಳೆಯಲ್ಲಿ ನಿಮ್ಮ ಉತ್ತರಗಳನ್ನು ಸೂಚಿಸತಕ್ಕದ್ದು**. OMR ಹಾಳೆಯಲ್ಲಿ ಅಂಡಾಕೃತಿಯಲ್ಲದೆ ಬೇರೆ ಯಾವುದೇ ಸ್ಥಳದಲ್ಲಿ ಉತ್ತರವನ್ನು ಗುರುತಿಸಿದರೆ, ಅದರ ಮೌಲ್ಯಮಾಪನ ಮಾಡಲಾಗುವುದಿಲ್ಲ.
6. OMR ಉತ್ತರ ಹಾಳೆಯಲ್ಲಿ ಕೊಟ್ಟ ಸೂಚನೆಗಳನ್ನು ಜಾಗರೂಕತೆಯಿಂದ ಓದಿರಿ.
7. ಎಲ್ಲಾ ಕರಡು ಕೆಲಸವನ್ನು ಪುಸ್ತಿಕೆಯ ಕೊನೆಯಲ್ಲಿ ಮಾಡತಕ್ಕದ್ದು.
8. ನಿಮ್ಮ ಗುರುತನ್ನು ಬಹಿರಂಗಪಡಿಸಬಹುದಾದ ನಿಮ್ಮ ಹೆಸರು ಅಥವಾ ಯಾವುದೇ ಚಿಹ್ನೆಯನ್ನು, ಸಂಗತವಾದ ಸ್ಥಳ ಹೊರತು ಪಡಿಸಿ, OMR ಉತ್ತರ ಹಾಳೆಯ ಯಾವುದೇ ಭಾಗದಲ್ಲಿ ಬರೆದರೆ, ನೀವು ಅನರ್ಹತೆಗೆ ಬಾಧ್ಯರಾಗುತ್ತೀರಿ.
9. ಪರೀಕ್ಷೆಯು ಮುಗಿದನಂತರ, ಕಡ್ಡಾಯವಾಗಿ OMR ಉತ್ತರ ಹಾಳೆಯನ್ನು ಸಂವೀಕ್ಷಕರಿಗೆ ನೀವು ಹಿಂತಿರುಗಿಸಬೇಕು ಮತ್ತು ಪರೀಕ್ಷಾ ಕೊಠಡಿಯ ಹೊರಗೆ OMRನ್ನು ನಿಮ್ಮೊಂದಿಗೆ ಕೊಂಡೊಯ್ಯಕೂಡದು.
10. ಪರೀಕ್ಷೆಯ ನಂತರ, ಪರೀಕ್ಷಾ ಪ್ರಶ್ನೆಪತ್ರಿಕೆಯನ್ನು ಮತ್ತು ನಕಲು OMR ಉತ್ತರ ಹಾಳೆಯನ್ನು ನಿಮ್ಮೊಂದಿಗೆ ತೆಗೆದುಕೊಂಡು ಹೋಗಬಹುದು.
11. **ನೀಲಿ/ಕಪ್ಪು ಬಾಲ್‌ಪಾಯಿಂಟ್ ಪೆನ್ ಮಾತ್ರವೇ ಉಪಯೋಗಿಸಿರಿ.**
12. **ಕ್ಯಾಲ್ಕುಲೇಟರ್, ವಿದ್ಯುನ್ಮಾನ ಉಪಕರಣ ಅಥವಾ ಲಾಗ್ ಟೇಬಲ್ ಇತ್ಯಾದಿಯ ಉಪಯೋಗವನ್ನು ನಿಷೇಧಿಸಲಾಗಿದೆ.**
13. **ಸರಿ ಅಲ್ಲದ ಉತ್ತರಗಳಿಗೆ ಋಣ ಅಂಕ ಇರುವುದಿಲ್ಲ.**
14. **ಕನ್ನಡ ಮತ್ತು ಇಂಗ್ಲೀಷ್ ಆವೃತ್ತಿಗಳ ಪ್ರಶ್ನೆಪತ್ರಿಕೆಗಳಲ್ಲಿ ಯಾವುದೇ ರೀತಿಯ ವ್ಯತ್ಯಾಸಗಳು ಕಂಡುಬಂದಲ್ಲಿ, ಇಂಗ್ಲೀಷ್ ಆವೃತ್ತಿಗಳಲ್ಲಿರುವುದೇ ಅಂತಿಮವೆಂದು ಪರಿಗಣಿಸಬೇಕು.**

**Instructions for the Candidates**

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of Hundred multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of the cover page. Do not accept a booklet without sticker seal or open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.

   **Example :** (A) (B) ● (D)

   where (C) is the correct response.
5. Your responses to the questions are to be indicated in the **OMR Sheet kept inside this Booklet.** If you mark at any place other than in the circles in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read the instructions given in OMR carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your name or put any mark on any part of the OMR Answer Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test OMR Answer Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must NOT carry it with you outside the Examination Hall.
10. You can take away question booklet and carbon copy of OMR Answer Sheet after the examination.
11. **Use only Blue/Black Ball point pen.**
12. **Use of any calculator, electronic gadgets or log table etc., is prohibited.**
13. **There is no negative marks for incorrect answers.**
14. **In case of any discrepancy found in the Kannada translation of a question booklet the question in English version shall be taken as final.**

## मराठी

## प्रश्नपत्र – II

**निर्देश** : या प्रश्नपत्रिकेत **शंभर (100)** बहुविकल्पीय प्रश्न आहेत. **प्रत्येक** प्रश्नाला **दोन (2)** अंक आहेत. **सर्व** प्रश्न **अनिवार्य** आहेत.

**1.** भाषेबद्दल ॲरिस्टॉटलची विचारप्रणाली पुढीलपैकी कोणती आहे ?

(A) विसंवादी (B) रूढिनिष्ठ

(C) श्रद्धामूलक (D) सादृश्यवादी

**2.** भाषेचे उत्पत्तिविषयक सिद्धांत आणि त्यांचे मीमांसक यांच्या जोड्या जुळवा.

a. श्रमध्वनिसिद्धांत — 1. प्रोफेसर हेस

b. धातुसिद्धांत — 2. जी रेवेझ

c. भावोद्गार सिद्धांत — 3. लुडविग् न्वार

d. संपर्क सिद्धांत — 4. जोहॉन्स

5. कॅडिलॅक

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | 3 | 1 | 5 | 2 |
| (B) | 2 | 5 | 3 | 1 |
| (C) | 4 | 3 | 1 | 5 |
| (D) | 5 | 4 | 1 | 2 |

**3.** बोली भाषांच्या अस्तित्वामुळे प्रमाणभाषा कमकुवत होते. तसेच प्रमाणभाषेच्या निर्मितीत, अस्तित्वात व विकासात बोलीभाषेचा फार मोठा वाटा असतो.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**4.** भाषेची लक्षणे पुढीलपैकी कोणी सांगितली ?

(A) ब्लुमफिल्ड (B) हॉकेट

(C) हॉल रॉबर्ट (D) एडवर्ड सपीर

**5.** 'संस्कृतीच्या सर्व अंगांचे स्वरूप ज्यांतून व्यक्त होते त्या अपरिहार्य माध्यमाचा म्हणजे भाषेचा अभ्यास मात्र कोणी करीत नाही' अशी खंत कोणी व्यक्त केली ?

(A) प्रल्हाद वडेर

(B) वि.बा. प्रभुदेसाई

(C) कृ.पां. कुलकर्णी

(D) ना.गो. कालेलकर

**6.** उसळ, कोशिंबीर खोबरे, तूप हे शब्द मराठीत कोणत्या भाषेतून आले आहेत ?

(A) तामिळ (B) हिंदी

(C) कन्नड (D) तेलगू

**7.** वागिन्द्रिय हे मुख्यत: श्वासोच्छ्वास आणि अन्नग्रहण या जैविक गरजांशी निगडीत आहे; स्वनांची निर्मिती हे काही वागिन्द्रियाचे कार्य नव्हे.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

8. मृदुतालूच्या टोकाला घशात लोंबकळणाऱ्या जिभेसारख्या भागाला काय म्हणतात ?
   (A) उपजिव्हा (B) अलिजिव्हा/पडजीभ
   (C) पश्चटाळू (D) स्वरतंत्री

9. मराठी शब्दाचा आरंभ पुढीलपैकी कोणत्या स्वनिमाने होत नाही ?
   (A) ज्ञ (B) न
   (C) क्ष (D) ळ

10. पुढीलपैकी कोणता शब्द लेखनदृष्ट्या योग्य आहे ?
   (A) साहीत्यमिमांसा (B) साहीत्यमीमांसा
   (C) साहित्यमीमांसा (D) साहित्यमिमांसा

11. भाषा ही अर्जित संपत्ती आहे, पण ती मानवाला ईश्वराकडून प्राप्त झालेली आहे.
   (A) संपूर्ण विधान बरोबर
   (B) सूंपर्ण विधान चूक
   (C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
   (D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

12. उच्चारणातील लघुतम सार्थ रूप म्हणजे काय ?
   (A) स्वन (B) स्वर
   (C) रूपिका (D) पदबंध

13. 'तुघलक' या गिरीश कर्नाड यांच्या कन्नड नाटकाचा अनुवाद मराठीत कोणी केला ?
   (A) विजय तेंडुलकर
   (B) वृन्दावन दंडवते
   (C) पद्माकर गोवईकर
   (D) चिं. त्र्यं. खानोलकर

14. 'एकविशंती' हे कोणत्या कथाकाराच्या कथांचे मराठी भाषांतर आहे ?
   (A) चेकॉव्ह
   (B) शरच्चंद्र चॅटर्जी
   (C) प्रेमचंद
   (D) रवीन्द्रनाथ टागोर

15. "शरीरं तावदिष्टार्थव्यवच्छिन्ना पदावली" ही काव्याची व्याख्या कोणाची ?
   (A) दण्डी (B) भामह
   (C) हेमचंद्र (D) वाग्भट

16. मम्मटाने 'यश', 'अर्थप्राप्ती', 'व्यवहारज्ञान', 'अशुभनिवारण', 'कांतासमित उपदेश' आणि 'उच्च आनंद' ही सहा प्रयोजने सांगितलेली असली; तरी तात्काळ होणारा अपूर्व असा आनंद याचा सर्वश्रेष्ठ प्रयोजन म्हणून गौरव केला आहे.
   (A) संपूर्ण विधान बरोबर
   (B) संपूर्ण विधान चूक
   (C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
   (D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

17. 'अपूर्ववस्तुनिर्माणक्षमा प्रज्ञा' असे प्रतिभेचे वर्णन कोणी केले आहे ?
   (A) आनंदवर्धन
   (B) राजशेखर
   (C) भरतमुनी
   (D) अभिनवगुप्त

**18.** सिद्धान्त आणि त्याचे मीमांसक यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. वक्रोक्तिविचार | 1. दण्डी |
| b. औचित्यविचार | 2. आनंदवर्धन |
| c. मार्गविचार | 3. क्षेमेन्द्र |
| d. ध्वनिविचार | 4. भामह |
| | 5. हेमचंद्र |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | 4 | 3 | 1 | 2 |
| (B) | 3 | 2 | 5 | 4 |
| (C) | 1 | 2 | 3 | 4 |
| (D) | 4 | 3 | 2 | 1 |

**19.** वामनाने सांगितलेली काव्यगुणांची संख्या किती ?

(A) 8 (B) 10

(C) 36 (D) 49

**20.** रसाला 'रसध्वनि' प्रथमत: कोणी म्हटले आहे ?

(A) अभिनवगुप्त (B) विश्वनाथ

(C) आनंदवर्धन (D) भट्ट लोल्लट

**21.** 'निसर्गप्रतिकृतिवाद' ही कोणत्या वादाची शाखा आहे ?

(A) स्वच्छंदतावाद (B) अभिजातवाद

(C) अस्तित्ववाद (D) अतिवास्तववाद

**22.** 'टीका म्हणजे वाङ्मयासंबंधीचे वाङ्मय होय' ही भूमिका कोणाची ?

(A) वा.ल.कुलकर्णी

(B) श्री.के. क्षीरसागर

(C) ना. वा. गोडबोले

(D) रा. शं. वाळिंबे

**23.** परंपरादत्त नियमांमुळे टीकेतला जिवंतपणा जातो, असे कोणी म्हटले आहे ?

(A) श्री. के. क्षीरसागर

(B) वा. भा. पाठक

(C) दि. के. बेडेकर

(D) वि.स. खांडेकर

**24.** ''कवितेतील सौंदर्याचा आस्वाद घेणे म्हणजे कवितेतील विविध घटकांच्या परस्परसंबंधातून साकार होणारा एकात्म, स्वायत्त व जीवनसदृश्य असा घाट अनुभवणे होय''– हे मत कोणाचे ?

(A) सुधीर रसाळ

(B) गो.म. कुलकर्णी

(C) गो.वि. करंदीकर

(D) विजया राजाध्यक्ष

**25.** युनोच्या वतीने १९७५ साली आंतरराष्ट्रीय स्त्रीमुक्ति वर्ष साजरे झाले असले, तरी स्त्रीवादी चळवळींना एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातच प्रारंभ झाला होता.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**26.** काव्याची भाषा ही विरोधाभासात्मक असते, असे प्रतिपादन कोणी केले आहे ?

(A) प्लेटो

(B) आय. ए. रिचर्डस्

(C) विल्यम एम्पसन

(D) क्लिअन्थ ब्रुक्स

**27.** मार्क्स आणि एंगेल्स यांनी साहित्य व कला यासंबंधी प्रासंगिक स्वरूपाचे लिखाण केले असून; त्याच्या आधारे मार्क्सवाद मानणाऱ्या त्यानंतरच्या समीक्षकांनी आर्थिक निश्चिततावाद, वैशिष्ट्यपूर्ण इतिहासविषयकदृष्टी आणि प्रगतिवादी दृष्टिकोण ही मार्क्सवादी समीक्षेची तीन प्रमुख तत्त्वे आहेत, असे मानले.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**28.** नाटकाचे माध्यम कोणते ?

(A) शब्द (B) मानवी शरीर

(C) घटना (D) स्वभावधर्म

**29.** स्तुतिकाव्ये व त्यांच्याशी संबंधित संस्कृती यांच्या जोड्या जुळवा.

a. स्तोत्र — 1. लोक

b. भारूड — 2. जनप्रिय

c. आरती — 3. भक्ती

d. पोवाडा — 4. नागर

5. आदिम

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | 5 | 1 | 4 | 2 |
| (B) | 4 | 3 | 2 | 1 |
| (C) | 3 | 2 | 1 | 4 |
| (D) | 2 | 4 | 5 | 3 |

**30.** पुढीलपैकी आख्यात प्रत्यय कोणता ?

(A) त (B) ऊन

(C) शी (D) ची

**31.** पुढीलपैकी शब्दयोगी अव्यय कोणते ?

(A) भालचंद्र (B) अबब

(C) साठी (D) किंवा

**32.** 'आता' 'एकता' 'माता', 'पिता' यांतील प्रत्ययघटित शब्द कोणता ?

(A) एकता (B) आता

(C) पिता (D) माता

**33.** कर्तरी प्रयोगात कर्त्याप्रमाणे क्रियापद चालते, तरीही इंग्रजीतील पॅसिव्ह व्हॉईस (Passive Voice) म्हणजे मराठीतील कर्मणी प्रयोग नव्हे.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**34.** 'जो माणूस व्यर्थ वेळ घालवतो तो मूर्ख आहे' हे कोणत्या स्वरूपाचे वाक्य आहे ?

(A) कर्मविस्तारक

(B) उद्देश्यविस्तारक

(C) विधेयपूरकाचे विस्तारक

(D) पूरकविस्तारक

**35.** पुढीलपैकी चुकीचे संबोधन ओळखा.

(A) माननीय

(B) महोदय

(C) माननीय महोदय

(D) आदरणीय

**36.** जाहिरातीला 'पासष्टावी कला' असे कोणी म्हटले आहे ?

(A) प्र. के. अत्रे

(B) न.चिं. केळकर

(C) दुर्गा भागवत

(D) वि.स. खांडेकर

**37.** बालक, माता, विरहिणी, प्राणी, पक्षी, फळे,समुद्र यांच्या वैशिष्ट्यांचा उपयोग तत्त्वविवरणासाठी करून घेतलेला महानुभाव पंथातील ग्रंथ कोणता ?

(A) सूत्रपाठ

(B) ज्ञानप्रबोध

(C) स्मृतिस्थळ

(D) दृष्टांतपाठ

**38.** 'श्रीचक्रधर चरित्र' या ग्रंथाचा कर्ता कोण ?

(A) वि.भि. कोलते

(B) शं. गो. तुळपुळे

(C) ह.ना. नेने

(D) वा.ना. देशपांडे

**39.** महानुभाव पंथीय ग्रंथ आणि ग्रंथकाराच्या जोड्या लावा.

| | |
|---|---|
| a. प्रतिष्ठानवर्णन | 1. राघव |
| b. डोमेग्रामवर्णन | 2. नरसिंह |
| c. चरित्र–आबाब–अन्वय | 3. एल्हण |
| d. वृद्धावली | 4. नागराज |
| | 5. कृष्णदास |

| | **a** | **b** | **c** | **d** |
|---|---|---|---|---|
| (A) | 1 | 2 | 3 | 4 |
| (B) | 3 | 4 | 2 | 1 |
| (C) | 4 | 3 | 1 | 2 |
| (D) | 1 | 3 | 4 | 2 |

**40.** 'प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) अ.ना. देशपांडे

(B) रा. श्री . जोग

(C) ह. श्री. शेणोलीकर

(D) ल. रा. नासीराबादकर

**41.** 'संतकाव्य महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाचे प्रतिबिंब असले तरी शाहिरी काव्य महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब आहे'. – हे विधान कोणाचे ?

(A) म. वा. धोंड

(B) म.ना. सहस्रबुद्धे

(C) श्री. म. वर्दे

(D) म.ना. अदवंत

**42.** ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा.

a. ज्ञानेश्वर विजय 1. श्रीधरस्वामी नाझरेकर

b. भक्तविजय 2. मोरोपंत

c. कृष्णविजय 3. निरंजन माधव

d. श्रीरामविजय 4. महीपतीबुवा ताहराबादकर

5. अमृतराय

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | 3 | 4 | 2 | 1 |
| (B) | 5 | 4 | 3 | 2 |
| (C) | 1 | 2 | 3 | 4 |
| (D) | 2 | 1 | 3 | 4 |

**43.** नको देवराया अंत आता पाहू।
प्राण हा सर्वथा। फुटो पाहे.
हा अभंग कोणी लिहिला ?

(A) जनाबाई

(B) कान्होपात्रा

(C) मुक्ताई

(D) सोयराबाई

**44.** 'कृष्णानंदसिंधु' हा अध्यात्मपर ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) अमृतराय

(B) मध्वमुनीश्वर

(C) माधवस्वामी

(D) निरंजन माधव

**45.** 'श्री समर्थाची बखर' या सांप्रदायिक बखरीचा कर्ता कोण ?

(A) भीमस्वामी (B) कल्याणस्वामी

(C) हनुमंतस्वामी (D) उद्धवस्वामी

**46.** 'शिवदिग्विजया'चे लेखक कोण ?

(A) रघुनाथ यादव

(B) कृष्णाजी अनंत सभासद

(C) खंडोबल्लाळ चिटणीस

(D) हनुमंतस्वामी

**47.** 'हटातटाने पटा रंगवुनी जटा धरिशी का शिरी। मठाची उठाठेव का तरी।' .... ही लावणी कोणाची ?

(A) रामजोशी (B) अनंतफंदी

(C) प्रभाकर (D) परशुराम

**48.** बखरकार हा एक Unconscious Artist आहे. हे मत कोणाचे ?

(A) गं. ब. ग्रामोपाध्ये

(B) ह. श्री. शेणोलीकर

(C) र.वि. हेरवाडकर

(D) यू.म. पठाण

**49.** ''खुडबुड हे उंदिर करिती
कण शोधायांते फिरती
परि अंती निराश होती
ते जातिल, रे, सोडुनिया सदनाला
गणगाते जसे अपणाला''

हे चरण कोणत्या कवीने रचलेला अंगाईत येते ?

(A) दत्तात्रेय कोंडो घाटे

(B) गोविन्दाग्रज

(C) ग.दि. माडगूळकर

(D) पी.सावळाराम

50. 'श्री गजानन विजय' या पोथीग्रंथाचा कर्ता कवी कोण ?

(A) तुकडोजी महाराज

(B) दासगणू महाराज

(C) गाडगे महाराज

(D) गजानन महाराज

51. ''शर आला तो
धावुनि आला काळ
विव्हळला श्रावण बाळ''
असे वर्णन कोणत्या कवीने केले आहे ?

(A) ग.ह.पाटील

(B) प्र.के. अत्रे

(C) वा.गो. मायदेव

(D) र.द.सरंजामे

52. ''नारी मज बहु असती
परि प्रीती तुजवरती''
असे श्रीकृष्णाने कोणत्या नाटकातील पदात म्हटले आहे ?

(A) स्वयंवर

(B) ब्रह्मकुमारी

(C) सौभद्र

(D) सुवर्णतुला

53. ''तीन पैशांचा तमाशा'' हे रूपांतरित नाटक कोणी लिहिले ?

(A) दादा कोंडके

(B) पु.ल.देशपांडे

(C) वसंत सबनीस

(D) चिं.त्र्यं. खानोलकर

54. कादंबरीकार व कादंबऱ्या यांच्या जोड्या लावा.

| | |
|---|---|
| a. हरी नारायण आपटे | 1. हद्दपार |
| b. नारायण हरी आपटे | 2. मी |
| c. श्री. ना. पेंडसे | 3. टारफुला |
| d. शंकर पाटील | 4. सारे प्रवासी घडीचे |
| | 5. न पटणारी गोष्ट |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | 4 | 3 | 2 | 1 |
| (B) | 5 | 2 | 1 | 4 |
| (C) | 1 | 2 | 3 | 4 |
| (D) | 2 | 5 | 1 | 3 |

55. 'आंइष्टाइनचे नवे विश्व' या पुस्तकाचा लेखक कोण ?

(A) मो.रा. गुण्ये

(B) लक्ष्मण लोंढे

(C) जयंत नारळीकर

(D) वा.ज. खेर

**56.** शिवाजी महाराजांवरील पुस्तके व त्यांचे लेखक यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. श्री छत्रपती शिवाजी महाराज | 1. ब. मो. पुरंदरे |
| b. राजा शिव छत्रपती | 2. वा.सी.बेंद्रे |
| c. श्री. शिव छत्रपती | 3. डॉ. हेमंतराजे गायकवाड |
| d. श्रीमान योगी | 4. रणजित देसाई |
| | 5. त्र्यं.वि.शेजवलकर |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | 2 | 1 | 3 | 4 |
| (B) | 2 | 1 | 5 | 4 |
| (C) | 5 | 2 | 4 | 3 |
| (D) | 1 | 2 | 3 | 4 |

**57.** 'व्यासपर्व' च्या लेखिका कोण ?

(A) दुर्गा भागवत

(B) इरावती कर्वे

(C) कुसुमावती देशपांडे

(D) विमलाबाई देशपांडे

**58.** 'उजव्या सोंडेचा गणपती' ही विज्ञान कथा कोणी लिहिली ?

(A) जयंत नारळीकर

(B) बाळ फोंडके

(C) सुबोध जावडेकर

(D) मंदाकिनी गोगटे

**59.** ''साहित्यनिर्मिती हा मानवाच्या सामाजिक जीवनातील सांस्कृतिक उपक्रम आहे''–असे कोणी म्हटले आहे ?

(A) सदा कऱ्हाडे

(B) दत्ता भगत

(C) दिगंबर पाध्ये

(D) शेषराव मोरे

**60.** मुळशीच्या सत्याग्रहाचे चित्रण पुढीलपैकी कोणत्या कादंबरीत आलेले आहे ?

(A) अवलिया

(B) रात्रीचा दिवस

(C) पाणी

(D) न पटणारी गोष्ट

**61.** साहित्यावर तत्तकालीन संस्कृतीचा ठसा उमटलेला असतो, तरी कोणत्याही काळाचे किंवा संस्कृतीचे परिपूर्ण आकलन त्या साहित्यातून होतेच असे नाही.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**62.** 'एकोणिसावे शतक हे ब्रिटिशांच्या जागतिक नेतृत्वाचे आणि आधुनिक भारताच्या जन्माचे शतक मानले जाते' अशा शब्दात ब्रिटिश राजवटीचे महत्व कोणी विशद केले ?

(A) आचार्य कालेलकर

(B) आचार्य देव

(C) आचार्य धर्माधिकारी

(D) आचार्य जावडेकर

**63.** 'दक्षिणा प्राइझ' कमिटीची स्थापना कोणत्या वर्षी झाली ?

(A) 1851

(B) 1852

(C) 1853

(D) 1854

**64.** 'सतीची चाल' बंद करावी म्हणून राजा राममोहन रॉय यांनी चळवळ सुरू केली; आणि त्यानुसार लॉर्ड बेंटिंकने 'सतीची चाल'कायद्याने बंद केली.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**65.** ''आपले लोकांत ज्ञानशून्यता जहाली आहे. तिचे कारण असे आहे की, लोक अर्थाखेरीज विद्या शिकतात'' असे पुढीलपैकी कोणी म्हटले आहे ?

(A) गो.ग. आगरकर

(B) लोकहितवादी

(C) म. जोतिराव फुले

(D) ताराबाई शिंदे

**66.** तर्कशुद्ध प्रतिपादन, अस्सल मराठी बाणा आणि स्त्रीवादी भूमिकेची झलक पुढीलपैकी कोणत्या ग्रंथात आढळते ?

(A) शतपत्रे

(B) माझ्या आठवणी व अनुभव

(C) स्त्री-पुरुष तुलना

(D) गुलामगिरी

**67.** 'मुक्ती कोन पथे ?' हा ग्रंथ पुढीलपैकी कोणी लिहिला आहे ?

(A) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(B) लोकहितवादी

(C) ताराबाई शिंदे

(D) विठ्ठल रामजी शिंदे

**68.** 'यंत्राने का बेकारी वाढते ?' असा निबंध पुढीलपैकी कोणत्या विचारवंताने लिहिला आहे ?

(A) लोकहितवादी

(B) गो.ग.आगरकर

(C) वि.दा.सावरकर

(D) म. जोतिराव फुले

**69.** वाङ्मयीन चळवळ सुरू होण्यास कारण की प्रस्थापित वाङ्मयाबद्दल नव्या प्रतिभावंत वाङ्मयकारांच्या मनांत रोष असून, आपले तेच वाङ्मय प्रस्थापित करण्याकडे त्यांचा कल असतो.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**70.** 'केसरी' या नियतकालिकाच्या विकासात, पुढीलपैकी कोणते नाव संबद्ध आहे ?

(A) कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

(B) विष्णू कृष्ण चिपळूणकर

(C) गोपाळ हरी देशमुख

(D) श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

**71.** भाषाशुद्धीच्या चळवळीशी पुढीलपैकी कोणत्या लेखकाचे नाव संबद्ध आहे ?

(A) ग.त्र्यं. माडखोलकर

(B) वि.दा. सावरकर

(C) दिनकर गांगल

(D) प्र.के. अत्रे

**72.** ''रांगोळी मग त्या स्थळी निजकडे घालावया लागली'' असे कोणत्या कवीने म्हटले आहे ?

(A) केशव कुमार

(B) केशवसुत

(C) मंगेश पाडगावकर

(D) कुसुमाग्रज

**73.** 'गंभीर' विषयाचे 'थिल्लर' चित्रण पुढीलपैकी कोणत्या साहित्यकृतीत आढळते ?

(A) योगभ्रष्ट

(B) ताम्रपट

(C) कोसला

(D) झेंडूची फुले

**74.** 'सरकार' असा आपल्या पत्नीचा उल्लेख कोण करीत असे ?

(A) गणपतराव बेलवलकर

(B) प्रल्हाद केशव अत्रे

(C) नारायण वामन टिळक

(D) प्र.ई. सोनकांबळे

**75.** दूर दिवा आहे की तारा; असा संभ्रम कोणत्या कादंबरीत आहे ?

(A) धग

(B) रणांगण

(C) वज्राघात

(D) बळी

**76.** लोकसाहित्याच्या संकलनाला शास्त्रीय स्वरूप देऊन त्याचा अभ्यास करण्याचा पहिला प्रयत्न कोणी केला ?

(A) बिशप थॉमस पर्सी

(B) रिचर्ड वॉगनर

(C) ग्रिम बंधू

(D) एफ. मायकेल

**77.** पुढीलपैकी कोणी 'जातककथा' चे संकलन आणि संपादन केले आहे ?

(A) दुर्गा भागवत

(B) सरोजिनी बाबर

(C) भदंत आनंद कौसल्यायन

(D) भवानीशंकर नियोगी

**78.** ग्रंथ आणि त्यांचे ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा.

a. लोकसाहित्याचे स्वरूप — 1. गंगाधर मोरजे

b. लोकसाहित्याची रूपरेखा — 2. प्रभाकर मांडे

c. लोकसाहित्य कलाविचार — 3. दुर्गा भागवत

d. लोकसंस्कृतीची क्षितीजे — 4. तारा भवाळकर

5. रा.चिं. ढेरे

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | 4 | 2 | 5 | 3 |
| (B) | 2 | 3 | 1 | 5 |
| (C) | 3 | 5 | 4 | 2 |
| (D) | 5 | 1 | 2 | 4 |

**79.** 'भारतमूलक' या लोकसाहित्यविषयक सिद्धांताचा जनक म्हणून कोणास ओळखले जाते ?

(A) मॅक्समुल्लर (B) जो. बेनफे

(C) अँड्र्यू लँग (D) टायलर

**80.** 'रॅलिक्स ऑफ ॲशियन पोयेट्री' या नावाचा लोकगीतांचा संग्रह कोणत्या पाश्चिमात्य अभ्यासकाने प्रकाशित केला आहे ?

(A) जॉर्ज फॉस्टर

(B) बिशप थॉमस पर्सी

(C) जॉन मिश

(D) जॉर्ज हरझॉक

**81.** तौलनिक साहित्याभ्यास ही एक स्वतंत्र विद्याशाखा असली, तरी मूलत: तिचे साहित्यशास्त्र वेगळे नाही. –असे कोणी म्हटले आहे ?

(A) निशिकान्त मिरजकर

(B) आनंद पाटील

(C) वसंत बापट

(D) पंडित आवळीकर

**82.** 'तौलनिक साहित्याभ्यास' ही विशिष्ट पद्धतीचा अवलंब करणारी एक संकल्पना आहे. ही संकल्पना साहित्याकडे 'संपूर्ण साहित्य' या दृष्टीने पाहते. ही संपूर्णता भिन्न भिन्न राष्ट्रीय साहित्यांच्या अंशांनी साधलेली असते. साहित्याची ही संकल्पना भाषाशास्त्रापासून मात्र वेगळी आहे.– अशी भूमिका कोणी मांडली ?

(A) रेने वेलेक

(B) एफ. डब्ल्यू. चँडलर

(C) मॅथ्यू आर्नोल्ड

(D) लेन कूपर

**83.** विशिष्ट साहित्याचा किंवा साहित्यिकाचा प्रभाव अन्य भाषिक साहित्यांवर पडल्याची भरपूर उदाहरणे आढळत असली, तरी अशा प्रभावाची कारणे भिन्न भिन्न असू शकतात.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**84.** भाषांतर आणि अनुवाद क्षेत्रात महत्वाचे कार्य करणाऱ्या 'नॅशनल बुक ट्रस्ट' या संस्थेची स्थापना केव्हा झाली ?

(A) 1950

(B) 1954

(C) 1960

(D) 1957

**85.** मराठीतील सौंदर्यशास्त्र हे इंग्रजी तत्वज्ञानाच्या प्रभावातून निर्माण झालेले असले; तरी त्यावर संस्कार मात्र भारतीय साहित्यशास्त्राचाच आढळून येतो.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**86.** 'कोणी बाई म्हणून जन्माला येत नाही, पण नंतर ती बाई बनविली जाते' हे विधान कोणाचे ?

(A) जॉन स्टुअर्ड मिल

(B) सावित्रीबाई फुले

(C) सिमॉन–द–बोव्हा

(D) ताराबाई शिंदे

**87.** 'जिणं आमुचं' हे आत्मकथन कोणी लिहिले ?

(A) इंदुमती जोंधळे

(B) शांताबाई कांबळे

(C) सिंधुताई सपकाळ

(D) बेबी कांबळे

**88.** स्त्रीशिक्षण कोणत्या पुरुषाचा जीवनव्रताचा भाग आहे ?

(A) राजा राममोहन रॉय

(B) धोंडो केशव कर्वे

(C) गोपाळ गणेश आगरकर

(D) ईश्वरचंद विद्यासागर

**89.** 'मुलगी झाली हो' या मुक्तनाट्याच्या लेखिका कोण ?

(A) रूपा कुलकर्णी

(B) सीमा साखरे

(C) उर्मिला पवार

(D) ज्योती म्हापसेकर

**90.** 'ज्याचा त्याचा प्रश्न' हा कथासंग्रह कोणाचा ?
(A) प्रिया तेंडुलकर
(B) सानिया
(C) विजया राजाध्यक्ष
(D) मेघना पेठे

**91.** 'ग्रामीण' आणि 'नागर' ही परस्परविरोधी विशेषणे आहेत. मात्र 'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' ही विशेषणे तशी नाहीत.
(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) संपूर्ण विधान चूक
(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**92.** 'उभे धागे-आडवे धागे' ही कादंबरी कोणाची आहे ?
(A) व्यंकटेश माडगूळकर
(B) रणजित देसाई
(C) ग.दि. माडगूळकर
(D) म. भा. भोसले

**93.** ग्रामीण साहित्य समीक्षक आणि त्यांचे ग्रंथ यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. रा. रं. बोराडे | 1. ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या |
| b. नागनाथ कोत्तापल्ले | 2. ग्रामीण साहित्य |
| c. आनंद यादव | 3. ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास |
| d. वासुदेव मुलाटे | 4. ग्रामीण कथा |
| | 5. ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध |

| | **a** | **b** | **c** | **d** |
|---|---|---|---|---|
| (A) | 3 | 1 | 4 | 5 |
| (B) | 2 | 5 | 1 | 3 |
| (C) | 4 | 2 | 3 | 1 |
| (D) | 5 | 3 | 2 | 4 |

**94.** निसर्ग आणि माणूस यांचे एका आदिम पातळीवर गुंतलेले निरागस भावविश्व पुढीलपैकी कोणत्या ग्रामीण कादंबरीतून चित्रित झालेले आहे ?
(A) इंधन
(B) कोसला
(C) गोतावळा
(D) इस्कोट

**95.** पुढीलपैकी कोणत्या कथाकारास 'प्रयोगशील ग्रामीण कथाकार' असे म्हटले जाते.
(A) बाबा पाटील
(B) द.मा. मिरासदार
(C) शंकर पाटील
(D) रामदास चवरे

**96.** ''पंधरा ऑगस्ट : एक संशयास्पद महाकाय भगोष्ट'' ही कविता कोणाची आहे ?
(A) केशव मेश्राम
(B) नामदेव ढसाळ
(C) दया पवार
(D) यशवंत मनोहर

**97.** पुढीलपैकी कोणास आंबेडकरी जलशेकार म्हटले जात नाही ?

(A) गोपाळबुवा वलंगकर

(B) किसन फागू बनसोडे

(C) रामचंद्र बाबा घाडगे

(D) शिवराम जानबा कांबळे

**98.** दलित लेखक आणि त्यांचे आत्मकथन यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. वसंत मून | 1. झुंज |
| b. बाबाराव मडावी | 2. ख्रिस्ती महार |
| c. रामराव झुंजारे | 3. वस्ती |
| d. बाळासाहेब गायकवाड | 4. आकांत |
| | 5. माऱ्हुडा |

| | **a** | **b** | **c** | **d** |
|---|---|---|---|---|
| (A) | 3 | 4 | 1 | 2 |
| (B) | 2 | 5 | 4 | 3 |
| (C) | 1 | 3 | 5 | 4 |
| (D) | 5 | 2 | 3 | 1 |

**99.** यशवंत मनोहर यांनी 'आंबेडकरवादी कथेतला चेकाव्ह' असे कोणास म्हटले आहे ?

(A) शंकरराव खरात

(B) बाबुराव बागूल

(C) बंधू माधव

(D) केशव मेश्राम

**100.** 'दस्तखत' हा कवितासंग्रह पुढीलपैकी कोणत्या दलित कवीचा आहे ?

(A) भुजंग मेश्राम

(B) अरुण काळे

(C) लोकनाथ यशवंत

(D) प्रकाश जाधव

ಚಿತ್ತು ಬರಹಕ್ಕಾಗಿ ಸ್ಥಳ

Space for Rough Work